**जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ नुसार**
**कार्यवाही करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
क्रमांक : जीवका-१००५/प्र.क्र.४३८/नापु-२३
मंत्रालय विस्तार, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑगस्ट,२००५

वाचा : १) शासन परीपत्रक क्र.जीवका-१७०३/८३०/प्र.क्र.२३६/नापु-२३,
दिनांक ०५, ऑगष्ट, २००३
२) शासन परीपत्रक क्र.साविव्य-२००४/प्र.क्र.१७३२/नापु-२८,
दिनांक १९ एप्रिल, २००५

-: **शासन परिपत्रक** :-

जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ ची अंमलबजावणी कार्यपध्दती केंद्र शासनाने पारीत केलेली आहे. या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात केली जाते. जीवनावश्यक वस्तू बाजारात सुरळीत उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीकोनातून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ३ मध्ये विविध परवाना / विनियमन करण्याचे अधिकार केंद्र व राज्य सरकारला दिलेले आहेत. त्यानुसार विविध परवाना / विनियमन तरतूदींचे पालन न करणाऱ्या तसेच जीवनावश्यक वस्तूंचा गैरव्यवहार करणाऱ्या व्यक्ती / संस्थाविरुध्द या कायद्यातील कलम ३ चा भंग झाला म्हणून फौजदारी गुन्हा नोंदविला जातो. फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणात पुरवठा शाखेकडून गुन्हा नोंदविण्यात येतो. असे गुन्हे परवाना आदेशातील तरतुदींनुसार पुरवठा यंत्रणेतील प्राधिकृत केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना नोंदविता येतात. त्याचप्रमाणे या कायद्यातील तरतुदीनुसार पोलिस सुध्दा धाडी घालून अथवा पोलिस तपासात आढळून आलेल्या गैरप्रकाराबद्दल जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ चा भंग झाला आहे, असे दिसून आल्यावर गुन्हे दाखल करतात. या कायद्यातील कलम ३ च्या तरतुदींचा भंग झाल्यास गुन्हा नोंदविल्यानंतर, गुन्ह्याचा तपास होऊन न्यायालयात दावाही दाखल केला जातो. अशा प्रकरणात गुन्हा सिध्द झाल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ७ मध्ये नमूद केलेल्या तुरुंगवासाच्या व इतर शिक्षा न्यायालयाकडून आरोपींवर ठोठावण्यात येतात.

२. जीवनावश्यक वस्तू कायद्याची अंमलबजावणी करत असताना, पुरवठा यंत्रणेला तपासात जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या कलम ३ अथवा परवाना / विनियमन आदेशांच्या तरतुदींचा भंग केल्याचे आढळून आल्याने अशा दोषींवर अत्यंत गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंदविलेले जातात. हे करताना पुरवठा यंत्रणेकडून तपासणी करुन मुद्देमाल जप्त केला जातो व त्यानंतर पोलिसांकडे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येतो. पोलिसांकडून फौजदारी गुन्ह्याची रितसर नोंद घेतली जाते. त्यानंतर पुरवठा यंत्रणेने "जप्त केलेल्या" मालाची विल्हेवाट त्या मालाच्या वाहनासह लावण्याचे अधिकार जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या

कलम ६ (अ) प्रमाणे "जिल्हाधिकारी" यांना आहेत. काही प्रकरणात पोलिसांना त्यांच्या तपासात आढळून आलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या गैरव्यवहारासंबंधी पोलिस स्वतःच फौजदारी गुन्हा दाखल करुन पोलिसांनी जप्त केलेल्या मालाची विल्हेवाट लावण्याचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे या कायद्याच्या कलम ६ (अ) प्रमाणे पाठवितात. अशाप्रकारे जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावनाची छाननी जिल्हाधिकारी करतात. आवश्यकतेनुसार जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा तपासणी करण्याचे अधिकार आहेत. या कायद्याच्या कलम ६ (ब) नुसार जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना "कारणे दाखवा" नोटीस बजावणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे संबंधितांस सुनावणीसाठी बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेणेही कायद्यानुसार व नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार सुध्दा बंधनकारक आहे. अशाप्रकारे जिल्हाधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस देऊन व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन जीवनावश्यक वस्तूंची विल्हेवाट कशाप्रकारे लावणे यासंबंधी निर्णय घ्यावयाचा आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी विल्हेवाटीचा निर्णय घेताना जप्त जीवनावश्यक वस्तू, शासन जमा करण्याचा निर्णय घेऊ शकतात. शासन जप्त करण्याचा निर्णय घेत असताना या वस्तू कलम ६(अ)(२) प्रमाणे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत या वस्तू सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दराने वितरण करुन आलेली रक्कम सरकारजमा करण्याचे आदेश देऊ शकतात. त्याचबरोबर जप्त मालमत्ता लिलावाने विक्री करुनही त्याची विक्री करुन सरकारजमा करण्याचे आदेशही देऊ शकतात. जिल्हाधिकारी काहीवेळा जीवनावश्यक वस्तू काही अटींवर संबंधितांना परत करु शकतात. अशावेळी वस्तू परत करताना जिल्हाधिकाऱ्यांकडून काहीवेळेला कोणतेही तारण (उदा.बँक हमी, रोखरक्कम इ.) स्वरुपात घेतली जात नाही. त्याचप्रमाणे बऱ्याच वेळेला पोलिसांकडून मालाची विल्हेवाट लावलेला अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना वेळीच सादर केला जात नाही. त्यामुळे कलम ६(अ) प्रमाणे वेळीच निर्णय होत नाही. अशा वेळेला संबंधित व्यक्ती परस्पर न्यायालयाकडून मालाचा ताबा मिळविण्यात यशस्वी होतात. वास्तविक या कायद्याच्या कलम ६(ड) प्रमाणे जिल्हाधिकारी व अपील प्रकरणी शासन याशिवाय इतर प्राधिकारास जोडण्याचे निर्णय देण्यात प्रतिबंध केलेला आहे. या बाबी टाळण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे दक्षता सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(अ) **पुरवठा विभागाकडून करण्यात येणारी विभागीय कार्यवाही** :- जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या कलम २ (ब) मध्ये नमूद केलेल्या वस्तूंचा गैरव्यवहार तसेच काळया बाजारात विक्री न करण्याच्या प्रमुख उद्देशाने अशा सर्व वस्तूंची विक्री, विनियम इ. उत्पादन, वाटप इ. संबंधी विविध प्रकारचे विनिमय आदेश / परवाना आदेश या कायद्याच्या कलम ३ नुसार केंद्र व राज्य शासनास आहेत. गैरप्रकार थांबविणे व ग्राहकांना सहजपणे या वस्तू उपलब्धक करणे हा या कायद्याचा मूळ हेतू आहे. या उद्देशाने विविध परवाना, विनियमन / नियंत्रण आदेशांची अंमलबजावणी पुरवठा यंत्रणेला नियमितपणे करावी लागते. त्यासाठी पुरवठा यंत्रणेने याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) पुरवठा यंत्रणेने त्यांच्या जिल्ह्यातील विविध परवान्यांची (उदा.रास्तभाव दुकान / केरोसीन, साखर, नाफ्ता, पेट्रोल पंप इ.) वेळच्यावेळी व नियमितपणे तपासण्या कराव्यात.

(२) अचानक तपासण्यांची मोहिमही राबविण्यात यावी.

(३) तपासणीत जीवनावश्यक वस्तूंचा गैरव्यवहार होत असल्याचे व या वस्तू काळया बाजारात विकल्या जात असल्याचे निदर्शनास आल्याचे दिसून आल्यास विहित पध्दतीने तपासणी, पंचनामा करुन अशा जीवनावश्यक वस्तू ताब्यात घ्याव्यात. अशा ताब्यात घेतलेल्या वस्तूंची विल्हेवाट जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ६(अ) प्रमाणे लावण्यात यावी.

(४) असे वरील (३) प्रमाणे कार्यवाही करताना आवश्यकतेनुसार परवाना निलंबित / रद्द करण्याची कार्यवाही रितसर करावी.

(५) जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ६(अ) प्रमाणे जप्त / ताब्यात घेतलेल्या मालाची विल्हेवाट लावण्यपूर्वी सदर कायद्यातील ६(ब) प्रमाणे "कारणे दाखवा" नोटीस देणे व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक राहील. याप्रमाणे प्राथम्याने व विहित कालावधीत कार्यवाही करावी. शक्यतो १५ दिवसांत अशी प्रकरणे निकाली काढावीत.

(६) पोलिसांकडून गुन्हा नोंदविल्यानंतर ६(अ) प्रमाणे मालाची विल्हेवाट लावण्यास उशीराने प्रस्ताव येतो. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी ६(ब) प्रमाणे कार्यवाही करुन शक्यतो १५ दिवसांत प्रकरण निकाली काढावे.

(७) ६(अ) प्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावताना बरेच अधिकारी मुद्देमाल कोणतेही तारण न घेता, अथवा जुजबी तारणावर सोडून देतात. त्यांची ही कृती या कायद्याच्या मूळ हेतूंशी विसंगत ठरते. त्यामुळे मुद्देमालाची विल्हेवाट लावताना शक्यतो बँक हमी घ्यावी. बँकहमी घेताना किमान नेहमीच्या किंमतीच्या किमान ५० टक्के आढावा किंमत इतकी घेणे आवश्यक राहील. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने क्रिमिनल अपिल (एसएलपी) ३४७/२००३ मध्ये सुध्दा निर्णय दिलेला आहे.

८) जीवनावश्यक वस्तूंचा गैरव्यवहार करताना वाहनांची ने-आण करण्यासाठी अथवा माल ठेवण्यासाठी वाहनांचा वापर करण्यात येतो. अशा वाहनांसंबंधी या कायद्याच्या कलम ६(अ) (क) च्या परंतुकानुसार अशा वाहनांच्या जप्तीनंतर वाहनाची किंमत वसूल करुन घेऊन वाहन सोडण्याची तरतूद आहे. या तरतूदीनुसारच वाहनांच्यासंबंधी कार्यवाही करण्यात यावी.

(ब) **फौजदारी / कारवाई / पोलीसांकडून करावयाची कार्यवाही** :-

(१) पुरवठा यंत्रणेने वरीलप्रमाणे कार्यवाही करताना गैरप्रकाराचे / काळा बाजार करणाऱ्यांना शिक्षा व्हावी, या दृष्टीने पोलिसांकडे गुन्हा नोंदविण्याचा विचार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. पुरवठा यंत्रणेकडून गुन्हा नोदविल्यावर पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवून तपास पूर्ण करुन लवकरात लवकर न्यायालयात आरोपपत्र दाखल करावे.

(२) पोलीसांनी तपासात जप्त केलेल्या मालाची कलम ६(अ) प्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी विनाविलंब जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवावा. असा प्रस्ताव आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या कायद्याच्या ६(ब) प्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून व म्हणणे ऐकून घेवून निर्णय द्यावा.

(३) पोलिस यंत्रणेने जप्त मालाची विल्हेवाट लावण्यासंबंधीच्या प्रकरणांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा.

(४) पोलीस कारवाई व जिल्हाधिकाऱ्यांकडील कारवाई या दोन्हीही कार्यवाही एकाचवेळी स्वतंत्रपणे करण्यास कोणताच प्रत्यवाय नाही. यामध्ये समन्वय साधण्यासाठी दोन्ही यंत्रणांनी १५ दिवसातून एकत्रितपणे अशा करणांचा आढावा घेवून कार्यवाही करण्याचे कसोशिने प्रयत्न करावेत.

(५) जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदविल्यानंतर पोलिसांनी त्वरित ६(अ) प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी आवश्यक तो अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा.

(६) ज्या प्रकरणात पुरवठा यंत्रणेने गुन्हा नोंदविलेला आहे, अशा प्रकरणात पुरवठा यंत्रणेकडून पोलिसांना खबर दिल्यानंतर पोलिसांनी त्याचवेळी व त्याचदिवशी पंचनामा करुन एफआयआर नोंदवून घ्यावा. याप्रमाणे गुन्ह्याच्या नोंदीसाठी सर्व प्राथमिक बाबींचीही पूर्तता विनाविलंब करुन घेऊन जिल्हा यंत्रणेला ६(अ) प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी त्वरित कळवावे.

(७) या कायद्याखाली जप्त केलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार फक्त जिल्हाधिकाऱ्यांनाच आहेत. जिल्हाधिकारी हे ६(अ) प्रमाणे व कलम ६ (क) प्रमाणे शासन यांच्या व्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्यांना जप्त केलेला मुद्देमाल सोडून देण्याचे अधिकार अथवा विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंध या कायद्याच्या कलम ६ (ड) प्रमाणे केलेला आहे. ही तरतूद पोलीसांनी व जिल्हाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून न्यायालयाकडून माल सोडण्याचे आदेश दिले जाणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी.

३. वरील (अ) व (ब) प्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी निर्णय घेताना काळजी घ्यावी.

४. शिधापत्रिकाधारकांना निश्चितपणे केरोसिन मिळावे, यासाठी शासनपत्र क्रमांक : रॉकेल-१००५/ प्र.क्र.४७८२/नापु-२५, दिनांक ०५ ऑगष्ट, २००५ अन्वये सुचना दिलेल्या आहेत. तसेच रास्तभाव धान्य दुकानाच्या तपासण्या करण्याच्या अनुषंगाने शासन परीपत्रक क्रमांक : साविव्य-२००४/प्र.क्र.१७३२/ नापु-२८, दिनांक १९ एप्रिल, २००५ अन्वये सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संबधित अपर जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिका-यांनी उपरोक्त सुचनांप्रमाणे तपासणी करुन दोषी आढळणा-या केरोसिन परवानाधारक/रास्तभाव धान्य दुकानदारांविरुध्द कठोर कार्यवाही करावी. **या कामामध्ये ढिलाई दर्शविणा-या अपर जिल्हाधिकारी / जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या गोपनीय अहवालामध्ये तश्या प्रकारची नोंद घेण्यात यावी.** वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करताना जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींना कोणतीही बाधा पोहोचत नाही, याची दक्षता संबंधितांनी घेणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ए. रामकृष्णन )

प्रधान सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रत,

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित

१) सर्व विभागीय आयुक्त
२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
३) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व अपर जिल्हाधिकारी
६) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
७) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनाय, मुंबई-३२
९) खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण)
१०) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण)
११) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
१२) अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय, मुंबई
१३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) सर्व पोलीस आयुक्त / सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१५) सर्व उप सचिव/सर्व अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१६) सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१७) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य,
मेकर टावर्स, एफ विंग, १२ वा माळा, कफ परेड, मुंबई-४०० ००५